जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/ २०/ २००३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 26 JUN 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. प्रशासन अधिकारी, शिक्षण प्रमुख
मनपा/नपा., प्राथमिक शिक्षण मंडळ, पुणे-५.

विषय : सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत, माध्यम - इंग्रजी

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक पीएलसी- १००२/ ( ११८०/२००२ )/प्राशि-३, दिनांक १०.६.२००३

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १. | रेवाबेन नागीनदास मेहता फाऊंडेशन १२ रेवा लोकेश ए बिबवेवाडी, पुणे-४११०३७. | न्यू हेवन्स स्कूल, कात्रज, पुणे. | इंग्रजी |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधीत संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधीत संस्था उघडणार नाही, असे संबधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.२०/- च्या स्टँपपेपरवर तसे हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा उघडणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर तसे हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा सुरु करणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या साक्षांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रति,
सचिव/अध्यक्ष, संबंधित संस्था रेवाबेन नागीनदास मेहता फाऊंडेशन १२ रेवा लोकेश ए बिबवेवाडी, पुणे-३७
Joshi/...

५३२८/३२

कायम विनाअनुदान तत्वावर/
~~विनाअनुदान/तत्वावर~~

जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा./पुवि/२० /२००४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :

27. FEB 2004

प्रति

१. ~~शिक्षणाधिकारी/(प्राथमिक),~~
~~जिल्हा परिषद,~~

२. शिक्षण ~~प्रमुख/प्रशासन/~~अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे-५.

विषय : सन २००२- २००३ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत. (माध्यम इंग्रजी )

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/ १००२ ( ११८७/०२ )/प्राशि-२, दिनांक १०/६/०३.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००२ पासून इ. १ ली च्या वर्गास --- फक्त सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष/सुरु/शासनाच्या~~ वर्षापासून शाळा सुरु करणाऱ्या खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान/तत्वावर/~~कायम ~~विनाअनुदान/तत्वावर/परवानगी देण्यात येत/आहे.~~ ~~मराठी~~ इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४. | ५. |
| १ | रिवाडेन नागिनदास मेहता फाऊंडेशन १२ श्री शोवा लोकेशा ए बिबवेवाडी | ब्ल्यू हेवन स्कुल कात्रज, पुणे | १ ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

कायम विना अनुदान

सदर परवानगी खालील शर्ती व अटीवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांने सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये स्वाभाविक शिस्त निर्माण करणे, तसेच नवतीशीलपणा, निर्गमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नवीन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा. असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४. मा. सचिव/अध्यक्ष,
रेपाविन मार्गिनदास मेहता फाउंडेशन, १२ शोवा लोकश,
ए बिबवेवाडी, पुणे.

कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र. 3030 /खाप्राशा/०५ – ०६
दिनांक — 26/10/05

अध्यक्ष / सचिव,
रेवाबेन नगिनदास मेहता फौंडेशन
१२ शेवा लोकेश ए विववेवाडी पुणे

विषय : सन २००२– ०३ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १) शालेय शिक्षण विभागाकडील क्र.व्ही एस एल /१००२/(११८०/०२)प्राशि –३ दि.१०.०६.०३
२) मा.शिक्षण उपसंचालककाकडील जाक्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता /पुवि /५३२८/३२/२०/०४/दि.२७.०२.०४ चे पत्र.

मा.शिक्षण मंडळ ठराव क्र.२९ दि.८.४.२००५ नुसार ब्ल्यू हेवन प्रायमरी स्कूल, कात्रज, पुणे या शाळेस सन २००२– ०३ या शैक्षणिक वर्षात इ.१ ली च्या वर्गास फक्त एका तुकडीस इंग्रजी माध्यमासाठी ~~विनाअनुदानित~~/कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर शाळा सुरू करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे १ यांचेकडील दि.२७.२.२००४ चे पत्रातील अटींचे पालन संस्थने करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

प्रत :–
मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

KED.DOC/SHRI/213

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा. क्र/खाप्राशा/ ५८४ २००३-०४
दिनांक २४/५/२००४

व्यवस्थापक/शाळाप्रमुख
रेवाबेन नागिनदास मेहता,
वर्ल्ड हेवन इंग्लिश मिडियम स्कूल
कात्रज, पुणे-४६.

विषय : कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजुरीबाबत.

संदर्भ : शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एस. १००२(१०००/०२) प्राशि – ३ दिनांक २३.०९.२००२

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया – वर्गांना सन २००३-०४ या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही असे या २० रू. स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे माध्यम | वर्ग/ तुकडया मान्यता |
|---|---|---|
| १ | इंग्रजी/मराठी माध्यम | इ. २रीच्या तुका वर्गास नैसर्गिक वाढीने. |

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

Scanned with CamScanner

Original papers

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा. क्र. ५०२६ खाप्राशा / ०५ – ०६
दिनांक — ९/२/०८

व्यवस्थापक/शाळाप्रमुख
. क्यू डेवन स्कूल. . . . . . . .
२७१३. . कात्रज कोंढवा रोड. . कात्रज पुणे-४६.

विषय : कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडया मंजुरीबाबत.

संदर्भ : शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एस. १००२ (१०००/०२) प्राशि – ३ दिनांक २३.०९.२००२

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया – वर्गाना सन २००४ – ०५/०५-०६, ०६-०७ या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही असे रू. २० किंवा रू. १०० . स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग / तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | इंग्रजी | ३ री | नैसर्गिक वर्ग | जून २००४ |
| | | ४ थी | नैसर्गिक वर्ग | जून २००५ |
| | | ५ वी | नैसर्गिक वर्ग | जून २००६ |

६ वी ७ वी-चे वर्ग मूळ ठिकाणी सुरु ठेवावेत.

अटी व शर्ती :

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून दयावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहीजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या नवीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असवयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विदयार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

Scanned with CamScanner

शिक्षणमंडळ कार्यालय, पुणे मनपा.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना, शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा / ५६९९ /०६-०७
दि. ३०।३।०६

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
रेवाबेन नागेंद्रदास मेहता फाउंडेशनची
व्ह्यू हेवन स्कूल,
२५/७ कात्रज कोंढवा रोड कात्रज पुणे-४६.

विषय- कायम विनाअनु दानित तत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि -३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | इ. ६ वी | नैसर्गिक प्रथमवर्ग | जून २००६ |
| | | इ. ७ वी | नैसर्गिक प्रथमवर्ग | जून २००६ |

**अटी व शर्ती:-**

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदरशाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/ ६७४८

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 20 SEP 2019

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

प्रति

अध्यक्ष/सचिव,

रेवबेन नगिनदास मेहता फौंउंडेशन, बिबवेवाडी, पुणे३७

विषय - सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र माहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०, जुन २०१२.

३. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र एसएफएस-१०१९/प्र.क्र.६१३/एसएम-२ दिनांक २७.०६.२०१९

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता,त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | रेवबेन नगिनदास मेहता फौंउंडेशन, बिबवेवाडी, पुणे३७ | ब्ल्यु हेवन्स सेकंडरीस्कूल महादेवनगर, शेलारमळा, कात्रज, पुणे ४६ | इंग्रजी | दर्जावाढ (राज्यमंडळ) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक (इ ६ वी ते इ १२ वी) सर्व शाखा | २०१९-२० |

अटी व शर्ती :-

१. शासन निर्णयातील अट क्र. १ नुसार सदर संस्थेने अतिरिक्त रुपये १५०००/- इतक्या रकमेचे चलन, अद्ययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्र, सन २०१६-१७ व २०१७-१८ चे लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती तसेच इयत्ता १ ली ते ५ वी चे आरटीई नमुना-२ प्रमाणपत्राची अद्ययावत प्रत संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पुर्तता न केल्यास शाळेची मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी सदर शाळेस प्रथम मान्यता देतांना उपरोक्त अटीची पुर्तता झाली किंवा नाही याची शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून खात्री करूनच पुढील कार्यवाही करावी.

२. सदर शाळेनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

४. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

५. ज्या व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

९. या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुबंई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

१०. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

(प्रविण अहिरे)

प्र.शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

Scanned with CamScanner

स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना
व विनियमन) अधिनियम २०१२अंतर्गत
स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा
स्थापन करण्यासाठी २०१९-२० या
शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: एसएफएस-१०१९/ प्र.क्र.६१३/एसएम- २
मदाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: २७ जून,२०१९

प्रस्तावना:- रेवबेन नगिनदास मेहता फौउंडेशन,बिबवेवाडी,पुणे ३७ संचलित, ब्ल्यु हेवन्स सेकंडरीस्कूल,महादेव नगर, शेलारमळा, कात्रज, पुणे ४६ या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ शाळा स्थापन करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम , २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत रेवबेन नगिनदास मेहता फौउंडेशन, बिबवेवाडी, पुणे ३७ संचलित, ब्ल्यु हेवन्स सेकंडरी स्कूल, महादेव नगर,शेलारमळा,कात्रज, पुणे ३७ या इंग्रजी माध्यमाच्या उच्च प्राथमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक शाळेस (इयत्ता ६ वी ते १२वी, इंग्रजी माध्यम सर्व शाखा, राज्यमंडळ), सन २०१९ -२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पुर्तता करण्याच्याअधीन राहून शासन परवानगी देण्यात येतआहे.

२.२ अटी व शर्ती-

१) सदर संस्थेने अतिरिक्त रुपये १५०००/- इतक्या रक्कमचे चलन, अद्ययावत बॅक बॅलेन्स प्रमाणपत्र, सन २०१६-१७ च २०१७-१८ चे लेखपरिक्षण अहवालाच्या प्रती तसेच इयत्ता १ ली ते ५ वी चे आरटीई नमुना -२ प्रमाणपत्रची अद्ययावत प्रत संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पुर्तता न केल्यास शाळेची मान्यता आपोआपक रद्य समजन्यात येईल.

२) बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम , २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची / तरतूदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम , २००९ मधील तरतुदीची पुर्तता करुन सन २०१९ -२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबीची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबीची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून

अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२७.०६.२०१९

(रा.वि.कुडले)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे ,
६. शिक्षणाधिकारी,जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), पुणे.

Scanned by CamScanner